# ३) आशियाई विकास बँक (ADB) सहाय्यीत

## "कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" (AIDIP)

केंद्र शासनाने ज्या राज्यांनी कृषि पणन कायद्यामध्ये मॉडेल ॲक्टप्रमाणे सुधारणा केलेल्या आहेत त्या राज्यांमध्ये कृषि उत्पादनाच्या वाढी बरोबरच महत्वपुर्ण असणाऱ्या "कृषि पणन व्यवस्था" या घटकाच्या विकासार्थ सार्वजनिक - खाजगी भागीदारीतून विविध उपक्रम हाती घेतलेले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य आशियायी विकास बँक सहाय्यीत "कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम" ह्या प्रकल्पात समाविष्ठ झाले असून या प्रकल्पाकरीता सहकार व पणन विभागाची कार्यकारी यंत्रणा व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांची अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्ति करण्यात आलेली आहे.

या प्रकल्पाद्वारे कृषि विकासाच्या मार्गातील सध्याच्या मुल्य साखळीचे कालबाह्य झालेले तंत्रज्ञान, कृषि विपणन क्षेत्रामधील पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये असलेला सार्वजनिक गुंतवणूकीचा अभाव, नगदी पिकांच्या बाबतीत असलेले मर्यादीत वैविध्यकरण इ. अडथळ्यांवर मात करण्याकरीता "एकात्मिक मुल्य साखळी" (Integrated value chain) या प्रतिमानावर (model) आधारीत राज्याच्या विविध भागांमध्ये उत्पादित होणाऱ्या कृषि मालाकरीता एकात्मिक मुल्य साखळ्यांची निर्मिती करण्यात येणार आहे. या मुल्य साखळ्यांतर्गत कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा व रस्ते, वीज, पाणी यांसारख्या इतर सुविधा त्याचप्रमाणे बाजारपेठ विषयक संशोधन (market intelligence), शेतकऱ्यांची क्षमता बांधणी (capacity building) व अस्तित्वात असलेल्या मुल्य साखळ्यांच्या बळकटीकरणाद्वारे कृषि मालाच्या मुल्य साखळी लगतच्या भौतिक व संस्थात्मक जाळ्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यात येणार आहे.

एकात्मिक मुल्य साखळीमध्ये कृषि व्यापाराशी निगडीत अनेक घटकांच्या म्हणजेच शेतकरी, व्यापारी, निर्यातदार तसेच उद्योजक व इतर सर्व स्टेक होल्डर्सच्या आवश्यक मुलभूत गरजा लक्षात घेवून राज्यातील त्या त्या भागामध्ये आवश्यक कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधा यामध्ये प्रामुख्याने संकलन केंद्रे, प्रतवारी व पॅकिंग केंद्रे, साठवणूक सुविधा, (Ambient and controlled temperature) मुल्यवर्धन आणि बाजारपेठे विषयक संशोधन, वितरण व लॉजिस्टीक्स आणि कृषि मालाच्या उत्पादनापासून ग्राहकापर्यंतच्या (end to end) बाजार जाळ्यांची निर्मिती करणे इ. चा समावेश आहे.

या प्रकल्पाअंतर्गत राज्यामध्ये एकात्मिक मुल्य साखळ्यांची निर्मिती सार्वजनिक खाजगी भागीदारीतून करण्यात येणार असून सर्व मुल्य साखळ्या "हब-स्पोक" मॉडेलवर आधारीत असतील. व्यापारी दृष्टीकोनातून उत्पादन क्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी "हब" स्थापन करण्यात येणार असून सभोवतालच्या उत्पादन क्षेत्रातून आवश्यक कृषि माल संकलित करण्याकरीता निरनिराळ्या ठिकाणी "स्पोक" स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक स्पोकच्या ३० ते ३५ कि.मी. अंतराच्या परिसरात विविध ठिकाणी "मोबाईल संकलन केंद्रे" निर्माण करण्यात येणार असून या संकलन केंद्राद्वारे स्पोक येथे कृषि माल येईल. हब व स्पोक यांची ठिकाणे व्यापारी दृष्टीकोनातून तसेच वाहतूकीच्या सोयी-सुविधा उपलब्ध असलेल्या मध्यवर्ती ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे विकसित करण्यात येणार आहेत.

स्पोकच्या ठिकाणी त्या-त्या भागातील प्रमुख नगदी पिकांचे उत्पादन लक्षात घेवून त्यानुसार पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने केळी, डाळींब, द्राक्ष, आंबा, मोसंबी,संत्रा, लिंबू,

पपई तसेच टोमॅटो, वांगी, बटाटा, कांदा, आले, मिरची इ. पिकांचा समावेश असेल. हबच्या ठिकाणी सर्व स्पोकमधून उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या कृषि मालाकरीता आवश्यक पायाभूत सुविधा यामध्ये प्रामुख्याने कृषिमालाच्या प्रकारानुसार मालाची सफाई, प्रतवारी, पॅकिंग, गोदामे, शितगृह, रायपनिंग चेंबर इ. तसेच मुलभूत सुविधांमध्ये नॉलेज सेंटर, व्यापार केंद्र, अतिथीगृह, अंतर्गत रस्ते, वीज व पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, बगीचा, उपहारगृह व वाहनतळ इ. चा समावेश असणार आहे. हब येथून कृषिमाल देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये विक्री करण्याकरीता रेल्वे, विमानतळ येथे आवश्यक कार्गो सुविधा व इतर पायाभूत सुविधांचा विकास करणे अपेक्षीत आहे.

पहिल्या दोन IVCs यशस्वी रित्या उभारणीतून करण्यात येणारे पुढील IVCs-

- नाशिक विभाग (अंदाजित खर्च रु.७५.३३ कोटी)
- औरंगाबाद-अमरावती विभाग (अंदाजित खर्च रु.२७.१३ कोटी)
- पुढील ७ वर्षात राज्यात साधारणत: १३-१५ IVCs उभारणे प्रस्तावित आहेत.

सदर सोयी सुविधा खाजगी गुंतवणूकदाराने विकसित करावयाच्या असून हब व स्पोक करीता आवश्यक असणारी जमीन शासन उपलब्ध करुन देणार असून यामध्ये शासकीय, कृषि उत्पन्न बाजार समिती किंवा सहकारी संस्थांच्या मालकीच्या जमीनींचा प्राधान्याने विचार केला जाणार आहे.

एकात्मिक मुल्य साखळी अंतर्गत ज्या शेतकऱ्यांचा/उत्पादकांचा समावेश करण्यात येईल त्यांचे गट बनविण्यात येतील व त्या नंतर गटांची उत्पादक कंपनी (Producers Company) तयार करण्यात येणार आहे. अशा प्रकारे सुमारे २०,००० शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येईल व किमान ३ उत्पादक कंपन्या स्थापन करण्यात येतील.

या प्रकल्पाकरीता भांडवली गुंतवणूकीचे प्रमाण खाजगी गुंतवणूकदार  किमान ६० टक्के, आशियायी विकास बँक - ३२ टक्के व राज्य शासन - ८ टक्के असे असून या प्रकल्पांतर्गत निर्माण होणाऱ्या पायाभूत सुविधा बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वाने उभारण्यात येणार असून त्याची संपुर्ण मालकी राज्य शासनाची राहणार आहे. या प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सोयी सुविधा खाजगी गुंतवणूकदारांस २० वर्षांपर्यंत वापरता येतील.

सदर प्रकल्पामध्ये निर्माण होणाऱ्या सुमारे २० एकात्मिक मुल्य साखळयांच्या माध्यमातून ग्रामिण भागांमध्ये कृषि व्यापार विषयक व पणन विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती होणार आहे. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे विविध फळे व भाजीपाला यांसारख्या नाशवंत कृषि मालाचा दर्जा वाढून त्यांच्या मागणीत वाढ होईल तसेच शेतकऱ्यांना अधिक बाजारभाव मिळू शकेल. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे व शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्यांमुळे शेतकरी थेट व्यापारी, निर्यातदार व प्रक्रियादार यांच्याशी करार करु शकतील व त्यामुळे त्यांना कृषि मालाच्या भावाची तसेच उत्पन्नाची हमी मिळेल. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने शेतकरी तांत्रिक दृष्ट्या सक्षम होतील, त्यामुळे कृषि मालाच्या दर्जामध्ये सुधारणा होईल. ग्राहकांना स्वच्छ व ताजा कृषि माल उपलब्ध होईल. या प्रकल्पांतर्गत विकसित होणाऱ्या मुल्य साखळयांभोवती कृषि प्रक्रिया उद्योगांच्या उभारणीस चालना मिळेल. अशा प्रकारे या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांमध्ये त्या त्या भागातील पिकांच्या उत्पादनानुसार आवश्यक त्या कृषि व्यापार विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती झाल्याने त्याचा लाभ शेतक-यांना होणार असून त्यांचे आर्थिक उत्पादन वाढणार आहे.

सद्यस्थिती-

- प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) निर्माण करण्यात आला आहे.
- पहिल्या टप्प्यातील दोन मूल्यसाखळ्यांमध्ये एकुण १५ जागा निश्चित करण्यात आल्या असुन त्यापैकी १४ जागांचे भाडेकरार करण्यात आले आहेत.
- पहिल्या टप्प्यातील या दोन मूल्यसाखळ्यां साठी IL&FS कडून प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आला आहे. या अहवालांना गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचवून योग्य गुंतवणूकदार निवडण्यासाठी डेलॉईट टोच त्सोमात्सु या सल्लागार संस्थेची निवड करण्यात आली आहे. संभाव्य गुंतवणूकदारांचे देकार मागविण्यासाठी जाहिरात (RFQ) प्रसिध्द केला असुन तो तयार केला असुन त्याचा मसुदा www.msamb.com वर उपलब्ध आहे. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारिख ८ एप्रिल २०१३ आहे.
- उपरोक्त १५ ठिकाणी उभ्या करण्यात येत असलेल्या सुविधांना शेतमालाचा निश्चित पुरवठा व्हावा यासाठी एक स्वतंत्र प्रकल्प जपान फंड फॉर पॉव्हर्टी रिडक्शन (JFPR) अंतर्गत राबविण्यात येत आहे. यामध्ये शेतक-यांच्या क्षमता विकासाच्या कामात PMU ला मदत करण्यासाठी विप्रो लि. या सल्लागार संस्थेची निवड करण्यात आली आहे. या संस्थेने आतापर्यंत प्रकल्पक्षेत्राचा अभ्यास अहवाल तयार केला असुन जवळजवळ २२००० शेतक-यांचे १४०४ गट स्थापन केले आहेत. तज्ञांचा एक चमु या गटांच्या प्रशिक्षण गरजांचा अभ्यास करत असुन लवकरच शेतक-यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांना सुरुवात होईल.
- प्रस्तावित चार मूल्यसाखळ्यांच्या कामासही PMU ने सुरुवात केली असुन त्या-त्या क्षेत्रातील उपलब्ध जागांची सूची बनविण्यात आली आहे. त्याचबरोबर या क्षेत्रातील सर्व सहभागी घटकांना प्रकल्पाची माहिती देण्यासाठी चार शहरांमध्ये कार्यशाळा जुलै २०१२ मध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या.
- या चार मूल्यसाखळ्यांसाठी प्रकल्प अहवाल तयार करुन त्यासाठी योग्य गुंतवणूकदार शोधणे आणि पहिल्या दोन मूल्यसाखळ्यांच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी केपीएमजी या सल्लागार संस्थेची (TAG २ - Transaction Advisory Group २)) निवड करण्यात आली आहे. केपीएमजी मार्फत पिकांची निवड करणेसाठी प्रकल्पाशी संबंधित विविध घटकांशी मुल्य साखळीनिहाय बैठका घेण्यात येत आहेत. तसेच खाजगी गुंतवणुकदारांशी चर्चा करण्यात येत आहेत. केपीएमजी मार्फत बाजार संशोधनासाठी सोलापूर - सांगली मुल्य साखळीमध्ये सर्व्हेचे कामकाज चालू केले आहे.
- प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या क्षमता विकासासाठी आशियाई विकास बँकेने आयएलएफएस क्लस्टर्स या सल्लागार संस्थेची नेमणूक केलेली आहे. या सल्लागार संस्थेने सार्वजनिक-खाजगी भागिदारी तत्वावर मूल्यसाखळी विकासासाठी सध्याचे धोरण विचारात घेऊन काय दिशा असावी हे निश्चित करावयाचे आहे, त्यासाठी आवश्यक तो माहिती प्रसारणाचा कार्यक्रम बनवायचा आहे, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष आणि संबंधित घटकांना आवश्यक प्रशिक्षणाचा तपशिल गोळा करुन त्यानुसार प्रशिक्षण आणि क्षेत्रिय भेटीद्वारे क्षमता विकासाचा कार्यक्रम राबवायचा आहे.

●●●●●